# सुसंगत
# डिझाइन

आज वर्गात गेलो तर मुलांचा कलकलाट सुरू होता.

आज मुलांना ‘सुसंगत व विसंगत गोष्टी’ शिकवायच्या होत्या. त्यावर काही स्वाध्याय तयार केले होते, ते ही सोडवून घ्यायचे होते.

पण मुलांचा मूड मात्र वेगळाच होता.

मुले म्हणाली,“आपण सारे मिळून सुसंगत विसंगत चा खेळ तरी खेळूया किंवा त्याची कोडी तरी सोडवूया.”

मला ही कल्पना आवडली.

आमच्या वर्गात तीन ट्युब लाइट आणि एक पंखा आहे. त्यामुळे फळ्याजवळच्या स्वीचबोर्डवर एकूण चार बटणं आणि एक रेग्युलेटर आहे.

मुलांना विचारलं,‘या स्वीच बोर्डवर सुसंगत काय ? आणि विसंगत काय ? ते ओळखा. आणि जर तुमचं उत्तर बरोबर आलं तरच पुढचा खेळ.

पण लक्षात ठेवा उत्तर देण्याची घाई करू नका.

मुलांची आपापसात कुजबुज सुरू झाली.

काही मुलांना वाटलं, बटणं एकसमान आहेत पण तो रेग्युलेटर जरा वेगळा आहे त्यामुळे बटणे सुसंगत. रेग्युलेटर विसंगत.

सिमरनचं मत आणखीनच काही वेगळं होतं.

वर्गातील ८० टक्के मुलांना वाटलं की तो ठोकळेबाज रेग्युलेटरच विसंगत आहे.

शाळेतल्या पुस्तकात असा एक स्वाध्याय होता की,एका चित्रात पाच वस्तूंचा समूह असे. त्या समूहातील जी गोष्ट इतरांपेक्षा वेगळी आहे ती विसंगत. म्हणूनच, ‘जी गोष्ट विसंगत आहे तिला बाहेर काढा; आणि सुसंगत गोष्टींचा समुह तयार करा’ हे काहि फारसे पटत नव्हते. पुस्तकात काही अपरीहार्य कारणामुळे ‘असा स्वाध्याय’ असणे ठीक आहे. पण दैनंदीन जीवनात आपन अनेक विसंगती सोबत घेऊन जगत असतो. केवळ सुसंगतच जगत नसतो.

त्यामुळे ‘त्या पुस्तकी ज्ञानाच्या’ बाहेर जाणारी व आपल्या जगण्याला भिडणारी ‘सुसंगत व विसंगतची नेमकी संकल्पना’ मुलांना कळणं अधिक गरजेचं होतं.

मूळ संकल्पनेच्या अधिक जवळ नेण्यासाठी मुलांना एक प्रश्न विचारला,“आता, याठिकाणी या चार बटणांमधे, रेग्युलेटर विसंगत आहे म्हणून जर का आपण तो येथून काढला तर काय होईल?”

या प्रश्नावर मुलांचे हात वर झाले.

१. पंखा बंद होईल.
२. स्वीचबोर्डवर तुटलेल्या वायरी दिसतील. भोकं दिसतील.
३. विचार करुन सिमरन म्हणाली,“पंखा बंद झाल्याने त्याचे एक बटण पण निकामी होईल.

आता गप्पांना खरी सुरुवात झाली.
सिमरनला आणखी काहीतरी सांगायचं होतं.
तिची बेचैनी तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

“रेग्युलेटर दिसायला मोठा आहे. बटणापेक्षा दिसायला वेगळा आहे म्हणून त्याला जर आपण विसंगत मानलं आणि काढून टाकलं तर आपला पंखा बंद होईल. त्याबरोबर एक बटण पण निकामी होईल. मग असं असताना त्या रेग्युलेटरला विसंगत का म्हणायचं? ” सिमरनने जरा ठणकावूनंच विचारलं.

तिची री ओढत सचिन म्हणाला,“रेग्युलेटरचा केव्हढा तरी फायदा होतो. आजोबांना लागतो स्लो पंखा आणि मला लागतो फुल्ल! त्यामुळे आजोबांच्या खोलीतला रेग्युलेटर असतो दोन वर आणि आमच्या खोलीतला पाच वर. पंख्याला रेग्युलेटर पाहिजेच. नाहितर माझे आजोबा गारठून जातील.”

“आपल्याला पंखा हवा म्हणजेच पंख्यापासून मिळणारी हवा हवी’ हे जर सुसंगत असेल तर त्या पंख्यासोबत रेग्युलेटर असणं हे ही सुसंगतच आहे!!

तो इतर बटणांपेक्षा मोठा आहे की दिसायला ठोकळ्यासारखा आहे, याचा काय संबंध? मी काही रेग्युलेटरला विसंगत म्हणणार नाही.” सिमरनने आपला मुद्दा व्यवस्थित रेटला.

थोडक्यात काय..
तर कोण ‘कसं दिसतं’ यावर आपण काही ठरवणार नाही!

तर कोण 'काय काम करतं' यावरच ठरवणार सुसंगत कोण आणि विसंगत कोण? हो ना?' यावर मात्र सगळ्यांनी माना डोलावल्या.

खरं म्हणजे, आमच्या पुस्तकातली सुसंगतची व्याख्या ही दिसण्यावर किंवा बाह्य गोष्टींवर अवलंबून होती.

पण मुलांनी मात्र नकळत सुसंगतचा संबंध हा त्या-त्या वस्तूच्या कर्माशी जोडला.

सुसंगती ठरवतना त्या-त्या वस्तूची उपयुक्तता जोखली पाहिजे असं ही त्यांनी सुचवलं.

मला पुस्तकातले स्वाध्याय बाजूला ठेवून नवीन तयार करावे लागले.

यानंतर आमचा परिसरात फिरण्याचा तास होता.

या तासासाठी 'सुसंगत' हीच संकल्पना पुढे नेण्याचं ठरवलं.

शाळा सुरू असताना जेव्हा ऐटित बाहेर फिरायला मिळतं तेव्हा तर मुलांना अधिक बरं वाटतं. फिरायला बाहेर जायचे असल्याने, तास सुरु झाला की मुले तोंड धुवून, केस विंचरुन येतात. बाहेर फिरताना विषयाशी संबंधित गप्पा मारणं व निरीक्षणं नोंदवणं असा कार्यक्रम असतो.

घराच्या खिडक्यांना बाहेरच्या बाजूंनी लोखंडी ग्रील लावलेली असतात. दरवाज्यांच्या बाहेर पण लोखंडाचा एक सेफ्टी दरवाजा असतो. बाहेर फिरायला जाऊ तेव्हा खिडक्यांच्या ग्रील्स व सेफ्टी दरवाजे यांची डिझाइन्स काळजीपूर्वक पाहायची असं ठरलं.

कारण ती डिझाइन्स सुसंगतच असतात.

आम्ही सर्वांनी मिळून वेगवेगळ्या प्रकारची सोळा सुसंगत डिझाइन्स पाहिली.

मुले फारच प्रभावित झाली होती.

फिरायला गेल्यावर असं काही पाहायचं असतं, हा त्यांच्यासाठी मोठाच शोध होता. नेहमीचाच परिसर आज ते वेगळ्या दृष्टीने पाहात होती.

"रोज मी याच वाटेने शाळेत येतो. पण इतकी डिझाइन्स आजच पाहिली.

कधी एकदा हे घरी जाऊन आईला सांगतो असं झालंय मला." सचिन नमूला सांगत होता.

"अरे आमच्या पण खिडकीच्या ग्रीलचं डिझाइन सुसंगत आहे, हे घरात कुणालाच माहीत नसणार बघ. मी घरी गेल्यावर बाबांना विचारणारच आहे." नमू म्हणाली.

वर्गात आल्यावर मुलांना स्थिरस्थावर होऊ दिलं. आपापसात बोलण्यासाठी थोडा वेळ दिला. आणि मग, फळ्यावर एक मोठा चौकोन काढला.

आता तुम्ही तुमच्या खोलीच्या खिडकीच्या ग्रीलचं डिझाइन काढा. डिझाइन हवं एकदम सुसंगत.

पण एक अट आहे.

तुम्ही आतापर्यंत जी काही डिझाइन्स पाहिली आहेत त्यापैकी कुठलंही काढायचं नाही. खिडकी तुमची आणि डिझाइन पण तुमचंच!

आता मुले कामाला लागली.

वेगवेगळी धमाल पण सुसंगत डिझाइन्स मुलांच्या वहीत दिसू लागली.

थोड्याच वेळात "माझी वही पाहा... आधी माझं पाहा...हे पाहा एकदम सही डिझाइन..." असा मुलांचा गलका सुरू झाला.

मुलांचा उत्साह उतू चालला होता.

नमू मात्र एकदम शांत होती.

नमूच्या जवळ गेलो.

तिने वहीत एक चौकोन काढला होता. त्या चौकोनात मध्यभागी एक मोठा गोल काढला होता व दोन कोपऱ्यात दोन छोटे गोल.

हातातली वही उंचावत नमू म्हणाली,"कशी आहे माझ्या खिडकीची ग्रील?"

त्यावेळी मला वाटलं, तिला या छोट्या व मोठ्या गोलात काही डिझाइन काढायचं आहे. आणि म्हणून ती विचारते आहे. आता हिला काय सुचवावं याचा मी विचार करू लागलो.

"आमच्या वाडीत एक कुत्रा आहे. त्याचं नाव काळू. काळू खूप चांगला आहे. मला तो खूप आवडतो. मी रस्त्यावर आले की माझ्या पायाशी तो प्रेमाने घोटाळत असतो.

बाबा त्याच्यावर ओरडले तरी तो त्यांच्यावर भुंकत नाही. पण तरीही बाबांना तो अजिबात आवडत नाही.

कधी बाबा बाहेर गेले की मी काळूला हळूच थोडावेळ घरात घेते. त्याला पटकन आंघोळ घालते. त्याला खायला देते. त्याचे लाड करते. काळूला मी खूप आवडते. पण बाबांना तो घरात आलेला सुध्दा चालत नाही. बाबांनी रात्री दरवाजा बंद केला की त्याला घरात येता येत नाही. मग तो अंगाचं मुटकुळं करुन दाराबाहेरच पडून राहातो.

पण माझ्या खिडकीला जर असं ग्रील लावलं ना तर काळू त्यातून आत येईल. माझ्या खोलीत येईल. मग माझ्या मित्राला रात्रभर घराबाहेर पडून राहायला नको.” नमूने असं सांगताच मला एक नवीनच साक्षात्कार झाला!

‘खिडकीतून कुणीसुध्दा आत येऊ नये किंवा नुसता हातसुध्दा आत घालू नये’ म्हणूनच आतापर्यंत आम्ही मोठी माणसं खिडक्यांना ग्रील लावत होतो.
कुणीतरी आत येईल या भीती पोटीच ग्रील्सची डिझाइन्स सुसंगत करुन घेत होतो.
ग्रील आणि मज्जाव हे समानार्थी शब्दच आहेत असाही आमचा समज होता.

पण जेव्हा नमू म्हणाली ‘मित्राला घरात येण्यासाठी ग्रील!’ तेव्हा मी चमकलोच.
इतके दिवस आपण चुकीचा विचार करत होतो याची जाणीव झाली.

मुले प्रेम जाणतात
म्हणून
ती निर्भय असतात.

आपण प्रेम करायला आणि ते ओळखायला ही कमी पडतो
म्हणून
आपल्याला प्रत्येक खिडकीवर बाहेरुन घट्ट बसवावी लागते एक मजबूत ग्रील.
आणि
या ग्रीलचं डिझाइन असतं आपल्या मनातल्या भितीशी सुसंगत!!

नमूने माझ्या मनातल्या खिडकीवरची ग्रील अलगद सैल केली!

तुम्हाला काय वाटतं, तुमच्या ग्रीलचं डिझाइन कशाशी सुसंगत आहे?

---

राजीव तांबे.